जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - ०६/०७/२०२३**

## पोलीस उपआयुक्त कार्यालय परिमंडळ - ४ पुणे शहर

# जबरी चो-या करणा-या आरोपींची केली झाडा झडती

मा.पोलीस आयुक्त श्री. रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री. संदिप कर्णिक तसेच मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजन कुमार शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत परिमंडळ -४ मध्ये होणा-या जबरी चोरीच्या घटनांना आळा बसावा तसेच परिमंडळ -४ मधील येरवडा, विमानतळ, चंदननगर, लोणीकंद, विश्रांतवाडी, खडकी व चतुश्रृंगी यापोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील आरोपीतांची तसेच त्यांचे गुन्हा करण्याचे पद्धतीची परिमंडळातील इतर पोलीस स्टेशन यांना ओळख होण्यासाठी आज दि. ०६/०७/२०२३ रोजी पोलीस उप आयुक्त परिमंडळ -४ श्री. शशिकांत बोराटे यांनी येरवडा पोलीस स्टेशन येथे परिमंडळ -४ हद्दीतील सर्व पोलीस स्टेशनचे अभिलेखामधील जबरी चोरी करणारे आरोपींची ओळख परेड घेतली. त्यामध्ये प्रत्येक आरोपीची गुन्हा करण्याची पद्धत तसेच त्याचा गुन्हेगारी अभिलेख याचे आदान प्रदान करण्यात आले. या आरोपींचे आदान प्रदानाचे कार्यक्रमामध्ये परिमंडळ -४ मधील ६५ सराईत गुन्हेगारांची माहितीचे आदान प्रदान करण्यात आले.

आरोपी आदान प्रदान कार्यक्रमास श्री. शशिकांत बोराटे पोलीस उप आयुक्त परिमंडळ-४ पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन श्री. बाळकृष्ण कदम, सपोनि गजानन जाधव लोणीकंद पोलीस स्टेशन, सपोनि विजय चंदन विमानतळ पोलीस स्टेशन, पोउपनि अंकुश डोंबाळे येरवडा पोलीस स्टेशन, पोउपनि रविंद्रकुमार वारंगुळे येरवडा पोलीस स्टेशन, पोउपनि लहु सातपुते विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पोउपनि रुपेश चाळके चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पोउपनि वैभव मगदुम खडकी पोलीस स्टेशन व पोउपनि दिलीप पालवे चंदननगर पोलीस स्टेशन असे सर्व पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी हजर होते. परिमंडळ – ४ मध्ये अशा प्रकारच्या वेगवेगळया गुन्ह्यातील आरोपींचे आदान प्रदानाचा कार्यक्रम यापुढे नियमीत सुरु राहणार आहे अशी माहिती पोलीस उपायुक्त परिमंडळ -४ यांनी दिली आहे.


वाहतूक विभाग